RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक १] बुधवार, मार्च ६, २०१३/फाल्गुन १५, शके १९३४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २०**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मार्च २०१३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२.**

क्रमांक ऊखक.-१०१०/प्र. क्र.४८/कराधान-३.- महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ (१९६२ चा महा. ९) च्या कलम १२ख च्या खंड (घ) अन्वये प्राप्त झालेल्या शक्तींचा तसेच या संदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटींच्या अधीन राहून स्तंभ (ख) मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत ऊस खरेदी करातून स्तंभ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या साखर कारखान्यांना स्तंभ (ग) मध्ये नमूद दिनांकापासून ऊस खरेदी करातून माफी देण्यात येत आहे.

**अनूसूची**

| साखर कारखान्यांचा वर्ग<br>(क) | कर माफीची मर्यादा<br>(ख) | अटी<br>(ग) |
|---|---|---|
| १. सहकारी साखर कारखाने,<br>२. बूट (BOOT) तत्वावर सह-वीज निर्मिती करणारे सहकारी साखर कारखाने ; आणि<br>३. खाजगी साखर कारखाने यांनी गाळपासाठी केलेली ऊस खरेदी. | संपूर्ण कर | (१) या साखर कारखान्यांनी ऊसाच्या चिपाडापासून वीज निर्मिती करण्यासाठी सह-वीज निर्मिती प्रकल्प स्थापित आणि कार्यान्वित केला असला पाहिजे.<br>(२) या साखर कारखान्यांनी महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (या पुढे याचा उल्लेख "MEDA" असा केला आहे.) यांच्याकडून मिळालेले पात्रता प्रमाणपत्र आणि विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पदनामित केलेल्या विक्रीकर सह आयुक्त यांनी दिलेले हक्कदारी प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे. |